# उमेद अभियानांतर्गत महिला सक्षम होणार- आ. खताळ

## १६३ महिला बचत गटांना २१ कोटी २१ लाख रुपयांचे वाटप



**संगमनेर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील १६३ महिला बचत गटांना उमेद (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) अंतर्गत २१ कोटी २१ लाख रुपयांचा निधी वाटप करण्यात आला. या माध्यमातून गावागावातील महिलांना व्यवसाय उभारणीसाठी भक्कम आर्थिक पाठबळ मिळाले असून, संगमनेर तालुका लवकरच महिला उद्योजकतेचा आदर्श ठरेल, असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

संगमनेर पंचायत समिती येथे समुदाय संसाधन व्यक्तींची आढावा बैठक व खेळते भांडवल, समुदाय गुंतवणूक निधीचे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. नीलम खताळ, प्रभारी गटविकास अधिकारी राजेंद्र ठाकूर आदी उपस्थित होते. आमदार खताळ म्हणाले, पूर्वी बँकांकडून बचत गटांना अपेक्षित सहकार्य मिळत नव्हते. मात्र आता तालुक्यातील गट थकबाकीमुक्त असल्याने २० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज विनातारण मिळत आहे. यासाठी सर्व बँक अधिकाऱ्यांचे अभिनंदन करतो. शालिनी विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जनसेवा कार्यालयातर्फे मोफत प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जातात. महिलांनी या संधींचा लाभ घ्यावा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सहकार्याने तालुक्यात महिला बचत गटांसाठी मोठ्या उद्योगांचे मार्ग मोकळे करण्यात येत असून, रोजगारनिर्मितीला गती मिळणार आहे असे ते म्हणाले.

# एसटीच्या ताफ्यात आता हायब्रीड इंधनाच्या बसेस

## परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**मुंबई (प्रतिनिधी)–** एसटी महामंडळ दरवर्षी पाच हजार याप्रमाणे पुढील पाच वर्षात २५ हजार बसेस घेणार आहे. यापैकी चालू आर्थिक वर्षापासून पुढील चार वर्षांत २० हजार बसेस या पर्यावरणपूरक अशा सीएनजी आणि एलएनजीसारख्या इंधनाबरोबरच डिझेल इंधन हायब्रीड करून चालणाऱ्या असतील. डिझेल इंधनाचा वापर केवळ आपत्कालीन परिस्थितीत केला जाणार असल्याने प्रवाशांची गैरसोय होणार नाही, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी येथे दिली.

सरनाईक यांनी आज पर्यावरणपूरक इंधनाच्या संदर्भात एसटी अधिकारी आणि संबंधित इंधन पुरवठादार संस्थांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेतली. उभा बैठकीत बोलताना त्यांनी एसटीच्या बहुतेक सर्व बसेस डिझेल इंधनावर चालणाऱ्या आहेत. महामंडळाच्या एकूण खर्चापैकी सुमारे ३४% खर्च हा इंधनावर होतो. महामंडळाला दररोज सुमारे १० लाख ७० हजार लिटर इतके डिझेल लागते. परिणामी वर्षाला सुमारे ३४ हजार कोटी रुपयांचा खर्च इंधनावर होतो, अशी माहिती दिली.

भविष्यात डिझेल इंधनाची उपलब्धता आणि त्याच्या दरात वारंवार होणारा बदल लक्षात घेता पर्यायी इंधन वापरणे आवश्यक आहे. सीएनजी आणि एलएनजी हे पर्यायी इंधन प्रकार तुलनेने डिझेलपेक्षा स्वस्त असून पर्यावरणपूरक देखील आहेत. शिवाय या इंधनाची कार्यक्षमता चांगली असल्याने बस प्रति लीटर पाच ते साडेपाच किलोमीटर अंतर कापते. सहाजिकच एलएनजी आणि सीएनजी इंधन वापरल्यास इंधनावरील खर्चात बचत होऊन प्रदूषण कमी होण्यास मदत होणार असल्याने पुढील वर्षीपासून खरेदी करण्यात येणाऱ्या नव्या २० हजार बसेस या हायब्रीड इंधनावर चालणाऱ्या असतील, असे सरनाईक यांनी सांगितले.

**खर्चात २३५ कोटींची बचत**

एसटी महामंडळाने यापूर्वी किंग्ज गॅस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनी सोबत केलेल्या करारानुसार एलएनजी इंधन हे तत्कालीन डिझेल इंधनाच्या किमतीच्या २०% कमी दराने पुरवठा करण्यात येणार आहे. त्यामुळे सध्याच्या खर्चात दरवर्षी २३५ कोटी रुपयांची बचत होणार आहे, अशी माहितीही सरनाईक यांनी दिली.

दरम्यान, राज्यभरात ९० ठिकाणी एलएनजीचे पंप उभारले जाणार आहेत. तसेच महानगर गॅस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून सीएनजीचे २० पंप उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे भविष्यात इंधन पुरवठ्याची व्यवस्था होणार असून या दोन्ही इंधनासोबत डिझेल इंधनावर चालेल अशी हायब्रीड बसेस तयार करण्याचे प्रस्ताव बसनिर्मिती कंपन्यांकडून मागविण्यात आल्याचे प्रताप सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

# बलुच आर्मीनं संधी साधत पाकिस्तानी सैन्याला हुसकावलं

**इस्लामाबाद–** इस्लामाबादमध्ये सध्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धासारखी परिस्थिती आहे. पाकिस्तानला ६ मे च्या रात्रीपासून भारताच्या हल्ल्यांना तोंड द्यावे लागत आहे. भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत मोठी कारवाई केली आहे. एका बाजूला भारताकडून दहशतवादी ठिकाणांवर कारवाई केल्याने पाकिस्तानी सैन्याची सळो की पळो अवस्था झाली आहे. तर दुसरीकडे बलुचिस्तानमध्ये त्यांच्यासाठी एक नवीन संकट उभे राहिले आहे. बलुच आर्मीने भारतासोबतच्या तणावाचा फायदा घेत पाकिस्तानी सुरक्षा दलांवर हल्ले वाढवले आहेत. अनेक भागांमध्ये विद्रोही गटांनी आजादीचे नारे देत झेंडे फडकवले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बलुच आर्मीच्या कमीतकमी तीन गटांनी बलुचिस्तान प्रांताच्या अनेक भागांवर ताबा मिळवला आहे. सोशल मीडियावर काही फोटो आणि व्हिडिओ समोर आले आहेत. यात बलुच विद्रोही इमारतींवरून पाकिस्तानचे झेंडे उतरवून बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याची घोषणा करत आपले झेंडे फडकवत आहेत. माजी पाक पंतप्रधान शाहिद खाकान अब्बासी यांनीही कबूल केले आहे की, सरकार आणि सैन्याचे बलुचिस्तानवरील नियंत्रण सुटत आहे.

**लवकरच पाकिस्तानच्या विभागणीची घोषणा**

बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याचे समर्थक असलेल्या गटांनी पाकिस्तानी सुरक्षा दलांवर अनेक हल्ले केले आहेत. क्वेटा शहरातच पाकिस्तानी सुरक्षा दलांना कमीतकमी चार मोठे हल्ले परतवून लावावे लागले आहेत.

# पेयजल योजनेच्या कामाची चौकशी करा; बैरागी यांची मागणी

**सिन्नर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील पांगरी बुद्रुक गावासाठी पंचाळे येथुन राबविण्यात आलेल्या राष्ट्रीय पेयजल योजनेतील गैरकारभाराची जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी स्वत: पारदर्शक चौकशी करावी व गैरकारभाराला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करावी. अन्यथा येत्या १९ मे रोजी योजनेच्या विहिरीत आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब बैरागी यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन देत दिला आहे.

पांगरी बुद्रुक गावासाठी पंचाळे येथुन राबविण्यात आलेल्या राष्ट्रीय पेयजल योजनेतील कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची लेखी तक्रार अनेक वेळेला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यालयाकडे केल्या आहेत. मात्र, चौकशीसाठी आलेले अधिकारी हे पेयजल योजनेतील गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी, पदाधिकारी व ठेकेदार यांना वाचवण्यासाठी पारदर्शक चौकशी करत नाहीत. खोटे अहवाल सादर करून शासनाची फसवणूक करत आहेत.

# राष्ट्र प्रथम! लग्नानंतर ४ दिवसांनीच जवान कर्तव्यासाठी रवाना

**वाशिम–**भारत आणि पाकिस्तानमध्ये सध्या तणावाचं वातावरण आहे. पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर दोन्ही देशांमध्ये संघर्षाची ठिणगी पडली. पाकिस्तानमधील दहशतवाद्यांना धडा शिकवण्यासाठी भारतानं ऑपरेशन सिंदूर राबवलं. भारताच्या एअर स्ट्राईकनं बिथरलेल्या पाकिस्ताननं भारतावर ड्रोन हल्ले करण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानचे सर्व हल्ले भारतानं निष्फळ ठरवले.

गेल्या काही दिवसांमधील घडलेल्या वेगवान घडामोडीमुळे भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धजन्य परिस्थिती आहे. त्यामुळे सुट्टीवर असलेल्या जवानांना तातडीनं ड्युटीवर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

वाशिम जिल्ह्यातल्या जऊळका रेल्वे या गावातील जवान कृष्णा राजू अंभोरे यांनी त्यांच्या देशभक्ती आणि कर्तव्यनिष्ठेचं उदाहरण सर्वांसमोर ठेवलंय. लग्नानंतर फक्त चार दिवसांनंतर ते सैन्याकडून आदेश मिळाल्यानंतर तात्काळ कर्तव्य बजावण्यासाठी रवाना झाले आहेत.

नवविवाहित पत्नीला सोडून जातांना कृष्णा अंभोरे यांचं मनं गहिवरलं होतं पण कृष्णाच्या डोळ्यांत केवळ राष्ट्रसेवेचं समर्पण होतं. त्यांना निरोप देण्यासाठी गावकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. गावकऱ्यांनी यावेळी जय जवान, वंदे मातरम या घोषणा देत अंभोरे यांना शुभेच्छा दिल्या. कृष्णाचं हे पाऊल संपूर्ण वाशिम जिल्ह्यासाठी प्रेरणादायी ठरलं आहे. देश आधी, बाकी नंतर हे त्याने आपल्या कृतिशील निर्णयातून सिद्ध केलं आहे.

पान १ वरुन

## दुसऱ्या दिवशीही पाकचे हल्ले निष्प्रभ

खेळ केल्याचे पुरावे भारताने समोर आणले.

भारताने प्रतिहल्ला करू नये म्हणून, पाकिस्तानने नागरी विमानांसाठी हवाईहद्द बंद केली नाही. त्यामुळे पाकिस्तानच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देताना, नागरी विमानांना आणि नागरिकांना नुकसान होऊ नये म्हणून भारताने सावध पावलं उचलत पाकला प्रत्युत्तर दिलं.

काल रात्री पाकिस्तानने भारतीय सीमेवर गोळीबार करून नागरिकांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केलाच, शिवाय ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ला करून नुकसान पोहोचवण्याचाही प्रयत्न केला. तथापि, पाकिस्तानचा हा प्रयत्न पूर्णपणे अयशस्वी झाला आणि पाकिस्तानच्या प्रत्येक अस्त्राला जागेवरच निष्प्रभ करण्यात आले.

एएनआयने संरक्षण सूत्रांच्या हवाल्याने सांगितले आहे की, पाकिस्तानकडून सुमारे ४०० ड्रोन्स पाठवण्यात आले होते, ज्यापैकी बहुतांश ड्रोन्सवर कोणतेही शस्त्र किंवा स्फोटके नव्हती. तथापि, हे ड्रोन्स कॅमेऱ्यांनी सज्ज होते, जे शक्यतो त्यांच्या ग्राउंड स्टेशनवर फुटेज पाठवत होते.

पाकिस्तानकडून पाठवण्यात आलेल्या या ड्रोन्सना लडाखच्या सियाचीन बेस कॅम्पपासून गुजरातच्या कच्छपर्यंत सुमारे २४ ठिकाणी पाहिले गेले. या सर्व ड्रोन्सना जागेवरच पाडण्यात आले. काही ड्रोन्स एअर डिफेन्स गनने तर काहींना सॉफ्ट किलने निष्प्रभ केले गेले.

भारताच्या सीमा क्षेत्रात घुसून या ड्रोन्सच्या मदतीने आपले नापाक मनसुबे पूर्ण करण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न होता, परंतु तो आपल्या या प्रयत्नात यशस्वी होऊ शकला नाही. भारताकडून पाडण्यात आलेल्या ड्रोन्सची काही छायाचित्रे आणि व्हिडिओ देखील समोर आले आहेत.

## जिल्हा प्रशासनातील सर्व यंत्रणा सज्ज!

पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवून पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल शोधून कारवाई करायची आहे. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती प्रसारित करीत असेल तर कारवाई होणार आहे.

महापालिकेने शहरात ब्लॅकआउट बाबत जागरूकता निर्माण करून सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्यायचे आहे. तसेच पोलिसांना कोंबिग ऑपरेशनची संख्या वाढवयाची आहे आणि गस्त चोख करायची आहे. सैन्याच्या तयारी संबंधित चित्रीकरण करण्यावर आणि समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यावर गुन्हा दाखल होणार आहे. अतिमहत्त्वाच्या विभागाचे सायबर ऑडिट करून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बैठकीला अतिरिक्त जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी यासह आपत्ती व्यवस्थापनातील सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

**ब्लॅकआउटवेळी रूग्णालयांनी काय करावे?**

आपत्कालीन परिस्थितीत ब्लॅकआउटवेळी हॉस्पिटलसोबत समन्वय राखण्यासाठी समन्वय यंत्रणा स्थापन करण्यात येणार आहे. टार्गेट होऊ नये म्हणून लाइट बंद केली जाते, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेव्दारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाइट दिसणार नाही, अशी व्यवस्था करावी लागणार आहे.

## आरोग्य, आपत्ती व्यवस्थापनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द

करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करा. ब्लॅकआऊटवेळी रुग्णालयासोबत समन्वय यंत्रणा उभी करा. लक्ष्य ठरू नये म्हणून वीज पुरवठा बंद केला जातो. त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून विजेचा प्रकाश दिसणार नाही, अशी व्यवस्था करा. ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवून व्यापक जनजागृती करा. केंद्र सरकारच्या युनियन वॉर बुक चे सखोल अध्ययन करीत त्याची सर्वांना माहिती द्या, अशी सूचना फडणवीस यांनी केली.

प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करावी. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करण्यात यावी. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना आपत्कालीन निधी आजच देण्यात येणार असून, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही महत्वाचा प्रस्ताव यासंदर्भात आला तर तो एक तासात मंजूर करा. मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या. त्यांनाही ब्लॅकआऊट बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्या, असे फडणवीस यांनी सांगितले.

पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोम्बिंग ऑपरेशन करा आणि गस्त अधिक चोख ठेवा. सैन्याच्या तयारीशी संबधित चित्रिकरण करणे आणि ते समाजमाध्यमांवर प्रसारित करणे हा गुन्हा असून त्यावर तत्काळ गुन्हे दाखल करा. सागरी सुरक्षा वाढविण्यासाठी आवश्यकतेनुसार फिशिंग ट्रॉलर्स भाड्याने घ्या. नागरिकांना परिस्थितीबाबत अद्ययावत आणि खरी माहिती पोहोचवणे यासाठी सरकारकडून व्यवस्था उभी करा. सरकारच्या अतिमहत्वाच्या पायाभूत सुविधांवर सायबर हल्ले होण्याची शक्यता लक्षात घेता सायबर विभागाकडून त्वरित सायबर ऑडिट करून घ्यावे. सरकार आणि सुरक्षा यंत्रणा यात अधिक समन्वयासाठी मुंबईतील सैन्याचे तिन्ही दल तसेच कोस्टगार्डच्या प्रमुखांना पुढील बैठकीत निमंत्रित करा, अशी सूचना देवेंद्र फडणवीस यांनी केली.

दरम्यान, समाज माध्यमातून खोट्या बातम्या, अफवा पसरवल्या जातात. खोट्या बातम्या सांगणे हा गंभीर गुन्हा आहे. त्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे याबाबत बैठकीत चर्चा होऊन निर्णय झाला आहे. सैन्य दल, तटरक्षक दलाकडून जी तयारी सुरु आहे त्याचे चित्रीकरण करून कुणीही समाज माध्यमात व्हिडीओ टाकून प्रसारित करू नये. सुरक्षेच्या दृष्टीने ते महत्वाचे आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीला प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षा दलाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गृह विभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी उपस्थित होते.

## तीन महिन्यांचे धान्य आगाऊ

योजनेनुसार, प्रत्येक कुटुंबाला दरमहा ३५ किलो धान्य मिळते त्यात २० किलो तांदूळ आणि १५ किलो गहू असतो. तसेच प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत ६ लाख ३७ हजार रेशनकार्डधारक असून २५ लाख ६३ हजार लाभार्थ्यांना दरमहा प्रती व्यक्ती ५ किलो धान्य मिळते त्यात ३ किलो गहू आणि २ किलो तांदूळ असतो. आता, जून, जुलै आणि ऑगस्ट या तीन महिन्यांचे धान्य एकाच वेळी लाभार्थ्यांना वितरित केले जाणार आहे. पुरवठा विभागाने जून महिन्याच्या नियमित उचल व्यतिरिक्त जुलै आणि ऑगस्ट महिन्यांचे धान्य ३० मेपूर्वी उचलून घेण्याची अंतिम मुदत जाहीर केली आहे.

या निर्णयामुळे संभाव्य पावसाळी हवामान, पूर किंवा इतर प्रतिकूल परिस्थितीत अडथळा येऊ नये, यासाठी गोदामांमध्ये पुरेशी जागा राखण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जागा अपुरी पडल्यास पर्यायी गोदामांची व्यवस्था करण्यात यावी. वाहतूक ठेकेदारांनी २० दिवसांत तीन महिन्यांचे धान्य उचल पूर्ण करण्यासाठी वाहने उपलब्ध करून द्यावीत, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

**रेशन दुकान दिवसभर सुरू राहणार**

तहसील स्तरावर गोदामातून धान्य वितरित झाल्यानंतर रेशन दुकानदारांनी तात्काळ लाभार्थ्यांना धान्य वाटप करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक दुकानदाराने दररोज दिवसभर दुकान खुले ठेवून लाभार्थ्यांना वेळेत तीन महिन्यांचे धान्य वितरण करावे, अशी सूचना पुरवठा विभागाने दिली आहे. केंद्र व राज्य शासनाच्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे आपत्कालीन परिस्थितीत अन्नसुरक्षेची खात्री राहील, अशी अपेक्षा आहे.

## श्रीरामपूरचा पाणी साठवण तलाव फुटला

चाळीतही पाणी शिरल्याने कांदा भिजल्याने या शेतकऱ्यांना मोठा आर्थीक फटका बसला आहे.

रात्री उशिरा ही गोष्ट लक्षात आल्यानंतर नागरिकांनी नगरपालिकेला याची कल्पना दिली. पाणीपुरवठा विभागाचे अभियंता निलेश बकाल यांनी तातडीने मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांना याबाबत कल्पना देऊन सदरचे पाणी रोखण्यासाठी पोकलॅन्ड उपलब्ध केले. परंतू, पाण्याचा दबाव जास्त असल्याने रात्री पाणी रोखण्यात अपयश आले. शेवटी सकाळी युद्ध पातळीवर यंत्रणा राबवून सदर पाणी बंद करण्यात आले. दरम्यानच्या काळात मोठ्या प्रमाणावर पाणी वाया गेले. त्यामुळे भविष्यात श्रीरामपुरकरांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागू शकते. पिण्याच्या पाण्याचे रोटेशन आता २५ मे च्या दरम्यान सोडण्यात येणार आहे. त्यातही पावसाळा लांबल्यास रोटेशन लांबण्याची शक्यता आहे.

सदर तलावाचे खोलीकरणाचे काम अहोरात्र सुरू असते. रात्री दहा वाजेपर्यंत सदर काम चालते व पहाटे पुन्हा सुरू होते. मात्र, काल काम करणारे लवकर घरी गेले होते. तसेच इथे सुरक्षारक्षक नसल्याने सदरचा प्रकार कोणाच्याही लक्षात आला नाही. रात्री उशिरा हा प्रकार समोर आला. पण, खूप रात्र झाल्याने त्यावेळी काहीच करता आले नाही. रात्री निरोप मिळताच मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप, पाणीपुरवठा अभियंता निलेश बकाल व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी रात्रीची यंत्रणेची जमवा जमव करून भल्या सकाळी वाहणारे पाणी बंद केले. सदरचे काम करताना संबंधित यंत्रणेने तलावात पाणी भरलेले असल्याने भराव खचला किंवा काय याकडे दुर्लक्ष केल्याने ही परिस्थिती उद्भवल्याची चर्चा शहरात असून फुटलेल्या तलावाची व त्यासंदर्भात झालेल्या कामाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी श्रीरामपूरकरांनी केली आहे.

## शहरवासियांना पाणीटंचाईची झळ बसण्याची शक्यता

श्रीरामपूर शहराच्या विस्तारित पाणीपुरवठा योजनेचे काम सध्या सुरू असून यामध्ये नगरपालिकेने शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी तलावामध्ये भराव टाकून तळ्याचे दोन भाग केले होते. चार महिन्यापूर्वी हा प्रयोग करण्यात आला. मात्र, पाण्याच्या दबावामुळे टाकलेला भरावाचा तीस फूट भाग काल वाहून गेल्याने पाच दिवस पुरणारे सुमारे सुमारे नऊ कोटी लिटर पाणी हे तलावातून वाहून गेले. त्यामुळे आगामी काळात शहरवासियांना पाणीटंचाईची झळ बसण्याची शक्यता आहे. एकीकडे तलावाच्या खोलीकरणाचे काम करत असताना दुसरीकडे शहराचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याचे दिव्य नगरपालिकेला पार पाडावे लागणार आहे. यासंदर्भात वरिष्ठांशी तसेच लोकप्रतिनिधींशी चर्चा करून शहरवासीयांच्या दृष्टीने योग्य निर्णय नगरपालिका घेईल.

**मच्छिंद्र घोलप**, मुख्याधिकारी, श्रीरामपूर नगरपालिका

## आता पीक विम्यासाठी शेतकरी हिस्सा घेतला जाणार

सरकारकडून पीक विमा योजनेत बदल करण्यासंदर्भात विचार करण्यात येत होता. आता महाराष्ट्र सरकारनं शासन निर्णय जारी करत सुधारित पीक विमा योजनेतील बदल जाहीर केले आहेत.

राज्य सरकारच्या शासन निर्णयात काय म्हटलं आहे?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षेतखाली २० मार्च २०२५ रोजी झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशांस अनुसरुन, राज्यात सद्य:स्थितीत राबविण्यात येणाऱ्या सर्वसमावेशक पीक विमा योजनेमध्ये बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शेतकऱ्यांकडून खरीपासाठी २%, रब्बीसाठी १.५% व नगदी पिकांना ५% असा शेतकरी हिस्सा घेतला जाईल. तर, उर्वरीत पीक हप्ता केंद्र व राज्य शासनामार्फत देण्यात येईल. पीक कापणी प्रयोगांवर आधारित, सुधारित पीक विमा योजना राबविण्याबाबतच्या प्रस्तावाला २९ एप्रिल२०२५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे.

सन २०२५-२६ च्या खरीप हंगामापासून महाराष्ट्रात सर्वसमावेशक पीक विमा योजनेमध्ये बदल करून, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, पूर्वीप्रमाणे विहीत केल्यानुसार, खरिपासाठी २%, रब्बीसाठी १.५% व नगदी पिकांना ५% असा शेतकरी हिस्सा घेवून, उर्वरीत पीक हप्ता हा केंद्र व राज्य शासन मार्फत देण्यात येऊन, पीक कापणी प्रयोगांवर आधारित, सुधारित पीक विमा योजना राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत वीज कोसळणे, गारपीट, वादळ, चक्रीवादळ यांमुळे लागलेली नैसर्गिक आग, पूर, क्षेत्र जलमय होणे, भूस्खलन, अतिवृष्टी, दुष्काळ, पावसातील खंड, किड व रोग इत्यादी बाबींमुळे उत्पादनात येणारी घट. या बाबींचा विचार करुन सुधारित पीक विमा योजना खरीप व रब्बी हंगामाकरिता, केवळ खालील जोखमीच्या बाबींचा समावेश करुन राबविण्यात येईल.

सुधारित पीक विमा योजना, ही योजना खरीप हंगाम २०२५ ते रब्बी हंगाम २०२५-२६ या हंगामांसाठी Cup Cap Model (८०:११०) नुसार राबविण्यात येणार आहे. पुढील कार्यवाही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात येऊन त्याबाबतचा शासन निर्णय स्वतंत्ररित्या जारी केला जाणार आहे.

## शरद पवार यांच्या विधानाच्या पार्श्वभूमीवर आता दोन्ही पक्षांच्या पदाधिकाऱ्यांमध्येही...

देशात तीनच व्यक्ती समोर येत असतात. राहुल गांधी, सुप्रिया सुळे व अखिलेश यादव. खासदार सुप्रिया सुळे या प्रगल्भ-व्यक्तिमत्वाच्या राजकारणी आहेत. त्या उगीचच काहीही वक्तव्य करत नाहीत. शरद पवार यांनी एकत्रिकरणाचा निर्णय खासदार सुळे घेतील, मी त्या प्रक्रियेत नाही असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे खासदार सुळे या संदर्भात कोणती भूमिका घेतील हे महत्वाचे आहे. त्यांनी याविषयी अद्याप काहीही वक्तव्य केलेले नाही. यासंबधी काही निर्णय घ्यायचा असेल तर तो लवकर व्हावा असे मत जगताप यांनी व्यक्त केले.

दीपक मानकर म्हणाले, यातून महाराष्ट्राला दिशा मिळेल, याचे कारण शरद पवार किंवा अजित पवार हे अन्य कोणत्याही राजकीय नेत्यांपेक्षा वेगळे, दुरदृष्टी असलेले नेते आहेत. वेगळे होण्याचे कारण स्वतः अजित पवार यांनीच वारंवार स्पष्ट केले आहे. विकासाची कामे करता यावीत, त्याला गती मिळावी याच कारणातून वेगळेपणे आले आहे. वेगळे असले तरी त्यांचे रक्ताचे नाते आहे. त्यामुळे ते एकत्र येतीलच.

शरद पवार यांनी यासंबधीची निर्णय खासदार सुप्रिया सुळे घेतील असे सांगितले आहे. त्याप्रमाणे अजित पवार व त्यांच्यात चर्चा होईल व ते ठरवतील काय करायचे. आम्ही नेहमीच अजित पवार यांच्यासोबत आहोत व राहणार. त्यामुळे त्यांचा जो काही निर्णय असेल तो आम्हाला मान्यच असेल. एकत्र यावेत अशीच आमची भावना आहे, पण याचा निर्णय नेत्यांच्या स्तरावर होणार आहे. त्यामुळे यासंदर्भात आम्ही फक्त आमची भावना व्यक्त करू शकतो, निर्णय त्यांनी घ्यायचा आहे. तो लवकर व्हावा असे मात्र आम्हाला वाटते.

## पाणलोटात काजव्यांचे आगमन

जैविक कचरा विघटन, परागीभवनामध्ये काजव्यांची भूमिका महत्त्वाची आहे.

काजव्यांमध्ये रासायनिक प्रक्रियेतून प्रकाश निर्माण होतो. हा प्रकास जैविक प्रकारचा असतो. काजव्यांच्या पोटात मॅग्नेशियम, प्राणवायू, लुसिफेरस आणि लुसिफेरीन यामध्ये रासायनिक प्रक्रिया होऊन प्रकाश निर्मिती होते.

रात्री काजव्यांच्या पोटातून लुकलुकणाऱ्या प्रकाशात झाडांच्या फांद्या उजळतात. लयबद्ध पद्धतीने लुकलुकणारे काजवे दिसतात. मिलनानंतर काही दिवसातच मादी पाणथळ जागेत अंडी घालते आणि पुढील पिढी जन्माला येते.

राज्यातील सर्वात उंच असलेल्या कळसूबाईच्या पायथ्याशी वसलेल्या उडदावणे, पांजरे, मुरशेत, भंडारदरा, चिचोंडी, बारी, मुतखेल, कोळटेंभे या आदिवासी खेड्यांच्या शिवारात तसेच रंधा धबधब्याजवळ हजारो झाडे लक्षावधी काजव्यांनी लगडली जातील. हिरडा, बेहडा, सादडा, जांभूळ, आंबा, उंबर अशा निवडक झाडांवरच काजव्यांचा हा काही दिवसांचा बसेरा वाढणार आहे. हे सौंदर्य न्याहाळण्यासाठी पर्यटकांची पावले या भागाकडे वळणार आहेत.